महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग ( उपाहारगृहे )
एम-१०, मंत्रालय उपाहारगृहे कार्यालय,
विस्तार इमारत, पोटमाळा, मंत्रालय, मुंबई,
क्रमांक : मंलेप-२०२६/निर्लेखन/प्र.क्र.१०७/मंउका
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- १४-०७-२०२६

-: निविदा सुचना :-

१. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील मुंबईतील मंत्रालय उपाहारगृह, चौरस आहारगृह येथील नादुरूस्त भंगार साहित्य जेथे आहे जसे आहे तसे विक्री करण्यासाठी अनुज्ञाप्तीधारक व विश्वास पात्र अशा स्थानिक ठेकेदारांकडून दोन लिफाफा ( तांत्रिक व वाणिज्य ) पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत.

उपरोक्त आहार/ उपहारगृहाच्या भांडारातील नादुरूस्त भंगार यामध्ये ॲल्युमिनियम, स्टील, पितळ व लोखंड इ. या धातुंच्या निकामी साहित्याचा समावेश आहे.

२. विक्रीसाठीचे निरूपयोगी साहित्य मंत्रालय उपाहारगृह येथे दि. १६-०७-२०२६ ते २१-०७-२०२६ या कालावधीत सुटीचे दिवस वगळून सकाळी २.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यत पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

३. निविदा विषयक विहित प्रपत्राच्या व निविदा नियमांच्या प्रती दिनाक २२-०७-२०२६ ते २८-०७-२०२६ या कालावधीत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी मंत्रालय उपाहारगृह कार्यालय एम-१०, पोटमाळा, विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई ३२ येथे सकाळी ०२.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यत उपलब्ध होतील.

४. सदर निविदा अर्ज शुल्क रू. ५०० /- रोख आहे. सदर रक्कम रोखीने स्वीकारण्यात येईल. सदर निविदेचे इसारा ( EMD ) शुल्क रू. १०,०००/- ( दहा हजार फक्त ) असून सदर रक्कम महाव्यवस्थापक, मंत्रालय उपाहारगृहे, मुंबई ( General Manager, Mantralaya Canteen ) यांच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफट द्वारे जमा करण्यात यावी.

महाव्यवस्थापक
मंत्रालय उपाहारगृहे